CNR :- MHRT07-001240-2016

## दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिपळूण यांचे न्यायालयात.

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७८/२०१६
श्री. अनंत लक्ष्मण माळी व इतर १ विरुध्द
श्रीमती लक्ष्मी दत्तात्रय माळी व इतर १६.

## निशाणी क्र. ०५ वरील आदेश

प्रस्तुतचा मूळ दावा वादी यांनी दावा मिळकत स.नं.९५, हिस्सा नं. ७ याचा गट नं. ९७, क्षेत्र ८.८०, पोटखराब १.३० आर (येथून पुढे संक्षेपाकरीता दावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे) ही त्यांचे कायदेशीर कब्जवेहिवाटीची आहे असा ठराव होवून मिळणेकरीता व प्रतिवादी क्र. १ ते १० अगर तर्फे असामींकडून दावा मिळकतीमधील वादींचे कब्जवेहिवाटीस हरकत, अडथळा करुन नये, त्यांना बेकायदेशीररित्या बेदखल करु नये असा निरंतर मनाई अनुतोष मिळणेकरीता तसेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण करुन उभारलेला सिमेंट पोल काढून घ्यावा असा आज्ञार्थी मनाई अनुतोष मिळणेकरीता दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज दावा प्रलंबीत असेपर्यत दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र. २, ८, ९ यांनी अथवा तर्फे असामींनी हरकत, अडथळा करु नये, दावा मिळकतीचे नुकसान होईल अशी कृत्ये करु नये असा तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत दावेचे कामी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी उपस्थित होवून त्यांची कैफियत व अर्जाचे म्हणणे निशाणी क्र. २६ येथे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यातील तसेच प्रस्तुत अर्जातील सर्व प्रतिपादने स्पष्टपणे नाकारलेली आहेत.

३. वादी, प्रतिवादींचे सदर परस्पर विरोधी अभिकथनांच्या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, ते कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे -

| अनुक्रमांक | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे सिध्द करतात काय ? | होय. |
| २. | न्यायाचे समतोलत्व वादींचे बाजूने आहे का ? | होय. |
| ३. | अर्ज नामंजूर केलेस वादींचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | होय. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

४. वादींनी गट नं. ९७ चा ७/१२ उतारा, फेरफार नोंद क्र. १३६ व ७०७ चे उतारे, दिनांक १४/०६/२०१६ व दिनांक २०/०९/२०१६ रोजीचे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या मोजणी नोटीसा, गट नं. १४३ चा ७/१२ उतारा, घर नं. ८२अ व ब चे कर आकारणी उतारे, गट नं. ९७ चे फोटोग्राफस, घटनेतील संदर्भातील पेनड्राईव्ह, आरटीएस अपील क्र. २१/२०१६ ची स्थळप्रत नोटीसीसह, फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २७८/१६ ची स्थळप्रत व शंकर हरी माळी यांचा वारस तपासाचा उतारा अशी कागदपत्रे निशाणी क्र. ०७ चे यादीसोबत अनुक्रमांक १ ते १३ येथे दाखल केलेली आहेत. तसेच वादींनी शशिकांत यशवंत कदम, अक्षया अनंत माळी व बळवंत बाबू माळी यांची शपथपत्रे, लक्ष्मी माळी हिचे मे. कार्यकारी दंडाधिकारी, खेड यांचेसमोरील दिनांक २५/०९/२०१२ रोजीचे प्रतिज्ञापत्र, तलाठी वालोपे यांनी कृष्णा माळी यांना दिलेले पत्र, फेरफार नोंद नं. ११६६ चा उतारा, लक्ष्मी माळी हिने संजय गांधी निराधार योजनेखाली केलेले प्रकरण व फोटोग्राफस अशी कागदपत्रे निशाणी क्र. ५० चे यादीसोबत अनुक्रमांक १ ते ८ येथे दाखल केलेली आहेत. प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

५. वादींतर्फे विधिज्ञ श्री. वाडकर व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. दिक्षित यांचा युक्तीवाद ऐकून घेतला. वादीचे विधिज्ञ श्री. वाडकर यांनी युक्तीवादारम्यान असे नमूद केले की, वादींचे पूर्वहक्कदार शंकर राघो माळी हे दावा मिळकतीमध्ये कुळ वहिवाटवादार होते व त्यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकत वादी यांचेकडे कब्जेवहिवाटीने आलेली असून त्यामध्ये वादींचा कायदेशीर कब्जा आहे. परंतु प्रतिवादी हे बेकायदेशीररित्या दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करीत असलेमुळे वादी मागणीप्रमाणे तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळणेस पात्र आहे. याउलट प्रतिवादींचे विधिज्ञ श्री. दिक्षित यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ लक्ष्मी दत्तात्रय माळी हिच्या पतीकडे कब्जेवहिवाटीने आलेली होती व दत्तात्रय याचे मृत्यूनंतर लक्ष्मी दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाटदार आहे. सबब वादी मागणीप्रमाणे कोणत्याही स्वरुपाचा अनुतोष मिळणेस अपात्र आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचे युक्तीवादाचे अनुषंगाने वादी, प्रतिवादी यांची प्रतिपादने व त्या अनुषंगाने दाखल केलेल्या कागदपत्रांचा, पुराव्याचा विचार करणे उचित ठरणार आहे.

**मुद्दा क्र. ०१ बाबत** -

६. वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे प्रतिपादनादरम्यान दावा मिळकत स.नं.९५, हिस्सा नं. ७ याचा नवीन गट नं. ९७ असलेचे व शिवराम हरी सोहनी हे मूळ मालक असलेचे तसेच ते अनेक वर्षापासून बेपत्ता असलेची बाब मान्य केलेली आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीचे वंशावळीमधील शंकर राघो माळी यांचेकडे कुळ वहिवाटीने होती व ते विनापाश सन १९६१ मध्ये मयत झाले अशीही बाब उभय पक्षकारांनी त्यांचे प्रतिपादनादरम्यान मान्य केलेली आहे. प्रस्तुत विवादीत नसलेल्या गोष्टीच्या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम उभय पक्षकारांच्या प्रतिपादनांचे अवलोकन करणे योग्य ठरणार आहे.

७. वादींचे प्रतिपादनाप्रमाणे, मौजे पेढे गाव श्री देव भार्गवराम या देवस्थान ट्रस्टला इनाम मिळालेले असलेने इनामदस्ताचा वाद मागील ६० वर्षापासून न्यायालयामध्ये प्रलंबीत असलेमुळे संपूर्ण गावातील मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार म्हणून श्रीदेव भार्गवराम व त्याखाली जमिन मालकांची नावे दाखल

आहेत. तथापि दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र. ८ ते १६ यांचे पूर्वाधिकारी रामा राघो माळी यांचा भाउ शंकर राघो माळी यांचेकडे कुळ वहिवाटीने होती. शंकर राघो माळी अविवाहीत सन १९६१ मध्ये मयत झाले. त्यानंतर दावा मिळकत वारसाहक्काने कुळ म्हणून रामा राघो माळी यांचेकडे आली. परंतु शंकर राघो माळी यांचा वारसतपास न झालेमुळे दावा मिळकतीचे ७/१२ सदरी शंकर राघो माळी यांचे नाव कायम राहिले. परंतु दावा मिळकतीमध्ये रामा राघो माळी याची मुलगी बाबीबाई हिची विवाहापूर्वी व विवाहानंतर प्रत्यक्ष कब्जेवहिवाट होती. वादींचे प्रतिपादनाप्रमाणे, दावा मिळकतीस लागून पूर्वेस गट नं. १४३ असून त्यामध्ये त्यांचे ग्रामपंचायत घर क्र. ८२ हा इमला असून सदर इमल्याचा पश्चिमेकडील दर्शनी भाग, अंगण, घरपरसाव दावा मिळकतीमध्ये आहे. सदर वस्तुस्थितीचे अनुषंगाने वादीने दाव्यासोबत खाजगी मोजणीदार यांचेकडून काढून घेतलेला वस्तुस्थितीदर्शक नकाशा जोडलेला असून दावा मिळकतीमधील घरपरसावचा भाग पिवळया रंगाने दर्शविलेला आहे.

८. वादींचे पुढील प्रतिपादनानुसार, प्रतिवादी यांचा शंकर राघो माळी अथवा रामा राघो माळी यांचेशी कोणताही संबंध नव्हता, परंतु प्रतिवादी क्र. १, ३ ते ७ यांचे पूर्वाधिकारी शंकर हरी माळी यांचे प्रथम नाव शंकर हे समान असलेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ हिने तिची मुखत्यार प्रतिवादी क्र. २ मार्फत दिनांक ०९/०३/२००० रोजी तलाठी, पेढे यांचेकडे वर्दी देवून फेरफार नोंद क्र. १३६ अन्वये शंकर राघो माळी याचा वारस मुलगा दत्तात्रय शंकर माळी असे दाखवून त्याची पत्नी प्रतिवादी क्र. १ लक्ष्मी हिचे नाव नोंदविले. सदर चुकीची नोंद वादी यांच्या अपरोक्ष झालेमुळे त्यांनी त्याबाबत हरकत घेतलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र. २ ही वादी नं. २ बाबीबाई हिचा भाउ गोपाळ याची सून असून कौटुंबिक वादामुळे ती प्रतिवादी क्र. ३ ते १० यांचेशी संगनमत करुन दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करत असते. प्रत्यक्षात प्रतिवादी क्र. १ लक्ष्मी ही नांदगाव, माळीवाडी, ता. खेड येथे रहात असून तिने दावा मिळकतमधील वादींचे कब्जेवहिवाटीस केव्हाही हरकत, अडथळा केलेला नाही. प्रतिवादी क्र. ३ याचे मालकीचा गोठा गट क्र. १०२ मध्ये व घर गट क्र. १०३ मध्ये असून त्यास ग्रामपंचायत पाखाडीपर्यंत जाणेयेणेकरता जवळचा मार्ग दावा मिळकतीमधील वादींच्या अंगणामधून मिळविणेचा होता म्हणून

त्यांनी इतर प्रतिवादींशी संगनमत केले. तथपि वादीने दावा मिळकतीच्या पश्चिमउत्तर बाजूस जाणेयेणेकरीता तीन फुट रुंदीचा मार्ग ठेवला. परंतु त्याचा वापर न करता प्रतिवादी क्र. ३ याने ग्रामपंचायतीकडे पूर्वापारची वाट अडविली अशी खोटी तक्रार करुन वादीच्या घराचे अंगणातून रस्ता मिळविणेचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग न झालेमुळे इतर प्रतिवादींशी संगनमत करुन तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे दावा मिळकतीचे मोजणीकरीता अर्ज दाखल केलेवरुन दिनांक १४/०७/२०१६ रोजीची मोजणी नोटीस वादीस प्राप्त झाली. त्यावेळी वादीस प्रतिवादी क्र. १ हिचे नावाची नोंद फेरफार क्र. १३६ अन्वये झालेचे समजले. सबब वादीने त्याविरुध्द अपील दाखल केले. परंतु दिनांक १७/१०/२०१६ रोजी दावा मिळकतीचे मोजणीदरम्यान मोजणीदार यांनी हद्द दर्शविली त्यावर प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र, ६, ८ ते १० यांचे मदतीने वादीचे अंगणामधील लादी फोडून खड्डे खणून सिमेंट क्रॉक्रीटचा पोल उभारला. सबब वादीने प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल केला.

९. प्रतिवादींचे प्रतिपादनाप्रमाणे दावा मिळकतीची विक्री शंकर राघो माळी याचे नावे होवून तो दावा मिळकतीचा एकटा मालक झालेला होता व प्रतिवादी क्र. १ चा पती दत्तात्रय याने त्याचे पालनपोषण केलेमुळे शंकर राघो माळी याने त्याचे हयातीमध्ये दावा मिळकत दत्तात्रय यास दिली. सबब दावा मिळकतीमध्ये शंकर राघो माळी याचेनंतर दत्तात्रय शंकर माळी व त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांची कब्जेवहिवाट आहे तसेच दावा मिळकतीचे ७/१२ सदरी प्रतिवादी क्र. १ हिचे नावाची नोंद फेरफार क्र. १३६ ने झाली असून केवळ वादी यांना त्यांचे गट क्र. १४३ मधील घरासमोरील मोकळा भाग जो दावा मिळकतीपैकी आहे तो ताब्यात मिळावा याकरीता प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेचे नमूद केलेले आहे.

१०. वादी, प्रतिवादींच्या सदर परस्परविरोधी प्रतिपादनांचे अवलोकन करता, दावा मिळकतीस लागून पूर्वेस गट क्र. १४३ आहे व सदर मिळकतीमध्ये वादींचे घर क्र. १८०अ व ब आहे तसेच दावा मिळकत ही शंकर राघो माळी याचेकडे कुळ वहिवाटीने होती अशी वस्तुस्थिती उघड होत आहे. तसेच शंकर राघो माळी हा सन १९६१ मध्ये मयत झाला अशी वस्तुस्थितीही स्पष्ट होत आहे. प्रस्तुत अर्जाचे

कामी वादी यांनी मागणी केलेल्या अनुतोषाचे अनुषंगाने दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे असे स्पष्ट होणे आवश्यक दिसून येत आहे. सबब प्रस्तुत दावेचे कामी वादीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन करणे योगय ठरणार आहे.

११. वादी यांनी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा (निशाणी क्र. ७/१) व फेरफार क्र. १३६ (निशाणी क्र. ७/२) दाखल केलेले आहेत. दावा मिळकतीचे ७/१२ उता-याचे अवलोकन करता दावा मिळकतीचे ७/१२ सदरी मालक म्हणून श्री देव भार्गवराम तसेच शिवराम हरी सोहनी व कुळ म्हणून प्रतिवादी क्र. १ हिच्या नावाची नोंद दिसून येत आहे. तसेच फेरफार क्र. १३६ चे अवलोकन करता दत्तात्रय शंकर माळी हा दिनांक १०/०४/१९८३ रोजी मयत झालेनंतर त्याची पत्नी लक्ष्मी हिचे नावाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ सदरी झालेचे दिसून येत आहे. परंतु वादींचे प्रतिपादनाप्रमाणे, शंकर राघो माळी व शंकर हरी माळी हे दोन स्वतंत्र व्यक्ती होते व प्रतिवादी क्र. १ हिचा पती दत्तात्रय हा शंकर हरी माळी याचा मुलगा होता व त्याचा शंकर राघो माळी याचेशी कोणताही नातेसंबंध नव्हता. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये प्रतिवादी क्र. १ हिचे पूर्वहक्कदारांचा शंकर राघो माळी, रामा राघो माळी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा नातेसंबंध होता अशी बाब नमूद केलेली नाही. याउलट प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये प्रतिवादी क्र. १ चा पती दत्तात्रय याने शंकर राघो माळी याचा सांभाळ केला म्हणून त्याने दावा मिळकत दत्तात्रय यास दिली अशी केस मांडलेली आहे. याचाच अर्थ शंकर राघो माळी याचेशी प्रतिवादी क्र. १ अथवा तिचे पतीशी कोणताही थेट नातेसंबंध नव्हता. सबब वारसाहक्काने प्रतिवादी क्र. १ हिच्या नावाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ सदरी झाली म्हणून दावा मिळकतीचा कब्जा तिला वारसाने प्राप्त झाला असे स्पष्ट होत नाही.

१२. वादींचे प्रतिपादनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. १ ही नांदगाव, माळीवाडी, ता. खेड येथील रहिवासी आहे व तिची दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जेवहिवाट नाही व तिने दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा केलेला नाही. प्रस्तुत प्रतिपादनाचे अनुषंगाने वादी यांनी प्रतिवादी क्र. १ लक्ष्मीबाई हिने संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पेन्शन मिळावी याकरीता तहसिलदार, खेड यांचेकडे अर्ज

केला याबाबतचे तिचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र. ५०/४) व संजय गांधी निराधार योजनेतील कागदपत्रे (निशाणी क्र. ५०/७) दाखल केलेली आहेत. प्रस्तुत कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ लक्ष्मी हिने ती निराधार महिला असून मागील २५ वर्षापासून तिचे माहेरी नांदगाव, ता. खेड येथे रहात असलेचे व तिचे सासरी मौजे पेढे, परशुराम येथे तिची कोणतीही मिळकत नसलेचे नमूद केलेचे दिसून येत आहे. या व्यतिरिक्त संजय गांधी निराधार योजनेबाबतचे कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ ही मौजे नांदगाव, ता. खेड येथील रहिवासी असलेचे, ती निराधार असलेने तिला संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून मदत मंजूर झालेचे दिसून येत आहे. याचाच अर्थ प्रतिवादी क्र. १ ही मौजे पेढे, परशुराम येथे रहात नसलेचे व दावा मिळकतीमध्ये तिचा कब्जा नसलेचे स्पष्ट होत आहे.

१३. या व्यतिरिक्त वादी यांनी फेरफार क्र. १३६ चे विरुध्द आरटीएस अपील क्र. २१/२०१६ मधील आदेशाची प्रत (निशाणी क्र. ५५/१) दाखल केलेली आहे. प्रस्तुत आदेशाचे अवलोकन करता फेरफार क्र. १३६ रद्द झालेचे स्पष्ट होत आहे. सबब प्रतिवादी क्र. १ ते १० हे ज्या फेरफार नोदींच्या आधारे दावा मिळकतीमधील प्रतिवादी क्र. १ चा कब्जा असलेचे कथन करतात त्यास कोणताही आधार प्राप्त होत नाही. सबब प्रतिवादी क्र. १ हिच्या नावाची नोंद पोकळ स्वरुपाची होती असेही उपरोक्त विवेवचनावरुन स्पष्ट होत आहे. प्रतिवादींचे विधिज्ञांनी युक्तीवादादरम्यान आरटीएस अपील क्र. २१/२०१६ विरुध्द अपील केले आहे अशी बाब कथन केलेली आहे. परंतु वादींतर्फे दाखल केलेल्या उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकन करता दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जेवहिवाट नसलेचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१४. प्रस्तुत दावेचे कामी वादी यांनी ते दावा मिळकतीचे कायदेशीर कब्जेवहिवाटीमध्ये आहेत असे प्रतिपादन नमूद करुन प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई अनुतोष मागणी केलेला आहे. सबब वादी दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीमध्ये आहेत असा महत्पूर्ण घटक दाव्याच्या या प्राथमिक अवस्थेमध्ये प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक ठरत आहे. सबब सदर महत्वपूर्ण घटकाचे अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांची प्रतिपादने व त्या अनुषंगाने नोंदविलेल्या पुराव्याचे

अवलोकन करणे न्यायोचित ठरणार आहे.

१५. वादी यांनी त्यांचे दावेसोबत राघो हरी माळी याची वंशावळ जोडलेली आहे. वादींचे प्रतिपादनाप्रमाणे राघो हरी माळी यास दोन मुलगे शंकर व रामा होते. पैकी शंकर अविवाहीत मयत झाला व रामा यास मयत गोपाळ, मयत सिताराम, प्रतिवादी क्र. १२ कृष्णा, प्रतिवादी क्र. ११ कृष्णीबाई व वादी क्र. २ बाबीबाई असे वारस होते व गोपाळ मयत यास प्रतिवादी क्र. ८ ते १०, मयत सिताराम यास प्रतिवादी क्र. १३ ते १६ असे वारस आहेत असे नमूद केलेले आहे. प्रस्तुत दावेचे कामी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दाव्यामध्ये नमूद केलेली वादींची वंशावळ नाकारलेली आहे. त्यांचे म्हणणेप्रमाणे राघो हरी माळी यास शंकर, संभाजी, महादेव, गोविंद, रामा, जनाई व वेणु असे वारस होते अशी बाब नमूद केलेली आहे. तथापि प्रस्तुत दावेचे कामी राघो हरी माळी याचे वंशावळीतील वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. ११ ते १३ व १५ ते १७ यांनी उपस्थित राहून प्रस्तुतचा दावा त्यांना मान्य असलेबाबतची पुरशीस निशाणी क्र. १८ येथे दाखल केलेली आहे. राघो हरी माळी याचे वंशावळीतील प्रतिवादी क्र. ८ धोंडू, प्रतिवादी क्र. ९ सुनिल व प्रतिवादी क्र. १० अनुसया यांनी दावा मिळकतमधील कब्जेवहिवाटीबाबत कोणतीही स्वतंत्र भूमिका घेतलेली नाही. प्रतिवादी क्र. ८, ९, १० व २ यांनी शंकर राघो माळी याचे मृत्यूनंतर दावा मिळकतीचा कब्जा रामा व त्याचे वारसांकडे हस्तांतरीत झाला व प्रत्यक्षात दावा मिळकतीमध्ये रामाचे कोण वारस कब्जेवहिवाटीमध्ये होते या महत्वपूर्ण वस्तुस्थितीचे अनुषंगाने विशिष्ट, स्वतंत्र केस मांडलेली नाही. याउलट रामा याचे इतर वारसांनी (प्रतिवादी क्र. ११ ते १३, १५ ते १७) दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जेवहिवाट असलेची बाब मान्य केलेली आहे.

१६. प्रस्तुतचे अर्जामध्ये वादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांच्या घर क्र. ८२ चे घरपरसाव, अंगण व उर्वरीत मिळकतीमध्ये ते भातशेती करुन कब्जेवहिवाटीमध्ये असलेची केस नमूद केलेली आहे. वादी यांनी दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशाचे तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी त्यांचे कैफियतीमध्ये मान्य केलेल्या वस्तुस्थितीवरुन वादी यांचे घर गट क्र. १४३ मध्ये असलेचे व घराचा पश्चिमेकडील दर्शनी भाग दावा मिळकतीमध्ये असलचे स्पष्टपणे मान्य केलेले आहे.

या व्यतिरिक्त वादी यांनी दावा मिळकतीमधील त्यांची कब्जेवहिवाट दाखविण्याच्या हेतुने बळवंत माळी याचे शपथपत्र (निशाणी क्र. ५०/३), फोटोग्राफस (निशाणी क्र. ५०/८) या कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे. साक्षीदार बळवंत याने त्याचे शपथपत्रामध्ये वादी यांनी दाव्यामध्ये तसेच अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जेवहिवाट असलेची बाब कथन केलेली आहे. या व्यतिरिक्त वादीतर्फे दाखल केलेल्या फोटोवरुन वादी हा भातशेती, भाजीपाला लागवड करुन कब्जेवहिवाट करीत असलेची बाब दिसून येत आहे. या व्यतिरिक्त वादी अनंत याने त्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये दाव्यातील कथनाप्रमाणे कथने नमूद केलेली आहेत. या व्यतिरिक्त दावा मिळकतीचे ७/१२ उता-याचे अवलोकन करता दावा मिळकतीमध्ये भात पिकाचे उत्पन्न होत असलेची बाब स्पष्ट होत आहे. उपरोक्त विवेचनामध्ये नमूद केलेप्रमाणे प्रतिवादी क्र. १ हिची दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट नसलेची बाब स्पष्ट झालेली आहे. तसेच रामाचे वारस प्रतिवादी क्र. ११ ते १३ व १५ व १७ यांनी दावा मिळकतीमधील वादींची कब्जेवहिवाट मान्य केलेली आहे. प्रस्तुत दावेचे कामी प्रकर्षाने दिसून येणारी बाब म्हणजे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १२ कृष्णा यांनी अपील दाखल केलेले होते व प्रस्तुत प्रतिवादी क्र. १२ कृष्णा यांनी वादीचा दावा मान्य करुन वादींची दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाट मान्य केलेली आहे. वादींचे कथन व त्या अनुषंगाने दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार करता, प्रथमदर्शनी वादी दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीमध्ये असलेची बाब दिसून येत आहे.

१७. वादी यांनी दावा मिळकतीमधील त्यांची कब्जेवहिवाट शाबीत करणेचे हेतुने वादी अनंत, साक्षीदार बळवंत यांची शपथपत्रे, ७/१२ उता-यातील दावा मिळकतीमधील पिकाच्या नोंदी, वादीने दाव्यामध्ये नमूद केलेली त्याचे घराची वस्तुस्थिती तसेच प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये दाव्यामध्ये नमूद असलेली वादीचे घराची वस्तुस्थिती मान्य केलेवरुन प्रथमदर्शनी दावा मिळकतीमधील वादींचा कब्जा दिसून येत आहे. सबब उपरोक्त सर्व विवेचनाचा विचार करता, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी असे नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०२ ते ०४ बाबत -**

१८. प्रस्तुत दावेचे कामी वादी यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा कब्जा

प्रथमदर्शनी दाखवून दिलेला आहे. वादी यांनी तुर्तातुर्त ताकिद अनुतोष हा केवळ प्रतिवादी क्र. २, ८ व ९ यांचे विरुध्द मागणी केलेला आहे. सबब प्रतिवादी क्र. २, ८ व ९ हे दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हकरत, अडथळा करतात अशी बाब स्पष्ट होणे आवश्यक आहे. वादींचे प्रतिपादनाप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ यास वादींचे घरासमोरील अंगणातून म्हणजेच दावा मिळकतीमधून बेकायदेशीर पायवाट पाहिजे या हेतुने प्रतिवादी क्र. १, २ व ४ ते १० यांचेशी संगनमत करुन दावा मिळकतीची मोजणी मागविली व त्या मोजणीच्या वेळी मोजणीदार यांनी दाखविलेल्या हद्दीवर प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. ६, ८ ते १० यांच्या मदतीने वादींचे घरासमोरील अंगणामध्ये असलेल्या लादया तोडून त्याठिकाणी खड्डे खोदून सिमेंट पोल उभारला व वादींचे नुकसान केले. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २, ८ व ९ यांनी वादीचे घरासमोरील अंगणातील लादी फोडून दोन सिमेंट पोल उभारले तसेच प्रतिवादी क्र. २, ८, ९ हे प्रत्यक्षात दांडगाई करुन हरकत, अडथळा करतात असे प्रतिपादन नमूद केलेले आहे. वादी यांनी हरकत, अडथळयाबाबतच्या प्रस्तुत प्रतिपादनाचे अनुषंगाने दिनांक १४/०७/२०१६ व दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या हद्द कायम मोजणी नोटीस (निशाणी क्र. ७/४ व ७/५) येथे दाखल केलेल्या आहेत. तसेच अंगणामधील लादी फोडून त्याठिकाणी सिमेंट पोल रोवत असलेबाबतचे फोटोग्राफ (निशाणी क्र. ७/९) येथे दाखल केलेले आहेत. हद्द कायम मोजणी नोटीसचे अवलोकन करता, लक्ष्मी दत्तात्रय माळी हिचेतर्फे मुखत्यार प्रतिवादी क्र. २ धनश्री माळी हिचे अर्जावरुन दावा मिळकतीची मोजणीची नोटीस देणेत आलेली होती असे दिसून येत आहे. तसेच वादीने दाखल केलेल्या फोटोग्राफवरुन अंगणातील लादी फोडून त्याठिकाणी सिमेंट पोल रोवले जात असलेचे दृश्य स्पष्ट होत आहे. वादींचे कथन व त्या अनुषंगाने दाखल केलेल्या प्रस्तुत कागदपत्रांचा विचार करता दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा होत असलेची बाब स्पष्ट होत आहे. या व्यतिरिक्त प्रस्तुत दावेचे कामी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास सक्त हरकत नोंदविलेली आहे. प्रतिवादींची प्रतिपादने दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा होता या तथ्याच्या अनुषंगाने संबंधीत ठरत आहेत. सबब दावा मिळकतीमध्ये सद्यपरिस्थितीमध्ये असलेला वादींचा कब्जा, वाद व प्रतिवादी यांचेमधील दावा मिळकतीचे अनुषंगाने

असलेले सर्व वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याकरीता दावा मिळकत जैसे थे परिस्थितीमध्ये राहणे आवश्यक व न्यायोचित ठरत आहे.

१९. मुद्दा क्र. १ चे विवेचनामध्ये नमूद केलेप्रमाणे वादी यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा कब्जा प्रथमदर्शनी शाबीत केलेमुळे त्या कब्जाचे सरंक्षण करणेस वादी पात्र ठरत आहेत. प्रस्तुत अर्जाचे कामी वादी यांनी मागणी केलेला तुर्तातुर्त मनाई अनुतोष मंजूर न झालेस दावा मिळकतीमधील वादींचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच दावा मिळकतीसंबंधातील हक्क व अधिकार यांचे सरंक्षण न केलेस वादींचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सबब उपरोक्त सर्व विवेचनाचा, वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचे युक्तीवादाचा विचार करता, मी मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर होकारार्थी असे नोंदवून मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २, ८ व ९ यांनी दाव्याचे अंतिम निकालापर्यंत दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जेवहिवाटीस स्वतः अथवा इतरांमार्फत हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद करणेत येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला).

ठिकाण - चिपळूण ( मनिषा ना. चव्हाण )
दिनांक - ३०/०१/२०१८ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिपळूण.

# C E R T I F I C A T E

| | |
|---|---|
| Judgment/Order in | R.C.S.No. 78-2016 |
| I affirm that the contents of this PDF file judgment/order are same words as per original judgment/order. | |
| Name of Stenographer | Santosh M. Jadhav |
| Court Name | Hon'ble Civil Judge J. D., and Judicial Magistrate F. C., Chiplun, Dist. Ratnagiri. |
| Date of Decision | 30-01-2018 |
| Judgment/order singed by Presiding Officer on | 31-01-2018 |
| Judgment/order uploaded on | 01-02-2018 |